IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# कोकणातील गौरी पूजन एक अभ्यास

**सहा. प्रा. सौ. स्वाती नवनाथ पवार**
**M. A. B.Ed (मराठी विभाग)**
एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय महाड. रायगड

**बीज शब्द:** कोकण, लोकप्रथा, गौरी, गणेशोत्सव, कृषि व्यवस्था, समाजजीवन, स्त्रित्व, पुजा पद्धती.

**प्रस्तावना**

गौरीगणपति हा सण कोकणातील सर्वात मोठा सण मानला जातो. कोकणात जपल्या जाणाऱ्या प्रत्येकप्रथेत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक असे अनेक पैलू दडलेले आहेत. विविध पारंपरिक सण उत्सव ग्रामीण भागात सुरू आहेत. आधुनिक काळात त्यांचे स्वरूप उत्सव साजरा करायच्या पद्धतीत झालेल्या बदलाने काहीसे झाकोळलेले असले तरी कोकणच्या ग्रामीण भागात प्रकर्षाने अनेक लोकोत्सव आजही जुन्याच पारंपरिक पद्धतीने साजरे केले जातात. त्यामुळेच आजही ते टिकून आहे. महाराष्ट्रात गौरीगणपति हा सण सर्व वर्गातून श्रद्धापूर्वक पाळला जातो. मुंबई, पुणे इथे कामासाठी गेलेले चाकरमानी कोकणात आपल्या गावी परततात. हा उत्सव साजरा करणारा बहुजन समाज कृषक तसेच मत्स्योपजीवी वर्गाशी निगडीत आहे.

स्त्रिया हा सण साजरा करायला माहेरी जातात. त्यांचा भाऊ त्यांना माहेरी न्यायला येतो तो त्यांना सूप घेऊन येतो. सोबत तांदुळाचे पीठ घेऊन जातो. तिथे त्या धमाल

मस्ती करतात. गौरिंचे आगमन अनुराधा नक्षत्रावर येतात मात्र तिचा पुत्र गणपति तिथीनुसार चतुर्थी दिवशी तिच्या आधी येतो. गौरी आणि गणपतीचे विसर्जन एकत्रच करायची पद्धत आहे. ज्या घरी गौरी स्थापना होत नाही तिथे गणपतीचे विसर्जन गौरी विसर्जनानंतर दीड, चार, सहा, अकरा किंवा एकवीस दिवसही असा श्रद्धेनुसार केला जातो.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

**उद्देश**

महामहोध्यापाय डॉ. काणे यांनी लिहीलेल्या ‘धर्मशास्त्राचा इतिहास’ या महत्वपूर्ण ग्रंथात गौरीपूजन प्रथाअथवाविधी बाबत फक्त दोन ओळींचीच माहिती येते.यामुळे रायगड जिल्ह्याचाद क्षिण भागाच्या विशेष संदर्भात कोकणातील गौरी पूजन या प्रथेचा मागोवा घेणे येथील प्रथा परंपरेचे दस्ताऐवजीकरण, स्थानिक आणि ग्रामीण सामाजिक प्रथांचा अभ्यास करणे आणि त्यातून अन्वया र्थ काढणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे. एखाद्या प्रदेशाची सांस्कृतिक ओळख तेथील लोकसाहित्या द्वारे होते. खरतर लोकांच्या जीवन जगण्यातूनच लोकसाहित्य आकाराला येत असते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत लेखिकेने प्रत्यक्ष स्वतः फिरून, उत्सव प्रसंगी हजर राहून निरीक्षणे नोंदविली आहेत. गरजेनु सार मुलाखती, छायाचित्रणाचा वापर केला आहे. मुलाखतीघेणे, लोकगीते आणि उपलब्ध प्रकाशित आणि अप्रकाशित अशा प्राथमिक तसेच दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

**व्रताचे स्वरूप**

भारतीय परंपरेत गौर म्हणजे पार्वती. लग्न न झालेली कुमारिका अशा अर्थानेही हा शब्द संस्कृत साहित्यात येतो. तर अशी ही गौर नुकताच पावसाळा संपत आलेला असतो शेतीची कामे थांबलेली असताना भाद्रपद महिन्यात

शुद्धपक्षात अनुराधा नक्षत्रावर ज्येष्ठागौरीचे आवाहन, ज्येष्ठा नक्षत्रावर तिचे पूजन आणि मूळ नक्षत्रावर तिचे विसर्जन,अशा तीन दिवसांच्या मूळ व्रताची

देवता आहे. यालाच‘ज्येष्ठागौरी पूजन’ असे म्हटले जाते. कोकणात मात्र तीस देवता कमी आणि घरातील माहेरवासिनी मानले जाते. त्यामुळे कोकणात त्यास गौरी पूजन संबोधतात. या नक्षत्रावर आपापल्या घरच्या पद्धतीप्रमाणे गौरीच्या प्रतिमा वा प्रतीके बसवितात. जेष्ठा नक्षत्रावर महालक्ष्मीचीपूजा करतात व महानैवेद्य दाखवितात. घाटावर या गौरी सपरिवार असतात. तिसऱ्या दि

वशी मूळनक्षत्रावर महालक्ष्मीचे विसर्जन करतात. गौरीलाच घाटमाथ्यावर या गौरीला महालक्ष्मी म्हणतात आणि तिची पूजा होते म्हणून तिला ज्येष्ठा गौरी म्हणतात (जोशी १९६२).

**मांडणी आणि पूजाविधीची पद्धत**

काळानुसार देवतांच्या पूजेंची पद्धत आणि परंपरा बदलताना दिसते. परंपरेनुसार पाणवठ्याव र जाऊन पाच, सात किंवा अकरा खडे आणून त्यांची पूजा करतात. शहरातहल्ली जवळ नैसर्गिक पा णवठा नसल्यास नळ, बोरवेल अशा ठिकाणाहून देखील गौरी आणल्या जातात. कोकण आणि देशाव र अथवा घाटमाथ्यावर पुजा पद्धती आणि मांडणी यात काहीसा फरक आहे.देशावर काही ठिकाणी पा च मडक्यांच्या उतरंडी करून त्यावर गौरीचे मुखवटे लावून त्या उतरंडींनाच साडी चोळी नेसवतात आणि त्यांची पूजा करतात. काही घरांत धान्याची रास म्हणजेच गहू, तांदूळ, ज्वारी, हरभरा, डाळ इ त्यादींपैकी एकदोन धान्याचे ढीग करून त्यावर मुखवटे ठेवतात. रायगडभागातीलकाही कुटुंबात गौरीं चे लाकडी, कागदी, पितळी अथवा आणि धातूचे मुखवटे असतात ते वापरलेजातात. बाजारात धातू च्या अथवा लोखंडी सळयांचावापर करून त्यावर मुखवटे ठेवतात त्यांना साडी चोळी नेसवतात. सुपा त धान्याची रास ठेवून त्यावर मुखवटा ठेवतात किंवा गहू आणि तांदूळ यांनी भरलेल्या तांब्यांवर मुखवटे ठेवून पूजाकरतात.आधुनिक काळात गौरीपूजनाच्या व मांडणीच्या पद्धतीत व गौरीच्या रूपात ही प्लास्टरचे मुखवटे वापरुन बदल केलेला दिसतो. आगमनाच्या दिवशी संध्याकाळी किंवा पंचांगात शुभ वेळ बघून मुखवट्यांची आणि लक्ष्मींच्या हातांची पूजा होते. त्याच रात्री गौरी उभ्या केल्या जा तात.महाराष्ट्रात गौरीचा सण हा कृषक वर्गाकडून जास्त प्रमाणात साजरा होत असला तरी कृषक समाजासोबत कोकणातील कोळी समाजबांधव देखील हा सण जोरदारपणे साजरा करततात. बाणकोटखाडीपरिसरातील कोळी बांधव गौरीला 'गौराई इलो' म्हणजे गौरी माता आली असे म्हणतो. भाद्रपद सप्तमीच्या दिवशी सायंकाळी स्त्रियांकरवी तेर

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

ड्याच्या झाडाची एक फांदी गौरीच्या रूपाने वाजतगाजत आणतात. दारात स्वागत करून घरात गौरीची स्थापना करण्यात येते. दुसऱ्या दिवशी दागदागिन्यांनी नटवूनसजवून दुपारी माशांच नैवेद्य दाखविला जातो. काहीजण शाकाहारी नैवेद्य देखील दाखवितात. सायंकाळी गौरीच्या समोर स्त्रिया नवी न साड्या नेसून फेर धरत पारंपरिकपद्धतीची गाणी म्हणत नृत्य करतात. अष्टमीला गौरीचे पूजन हो ते. नवमीच्या दिवशी सायंकाळी कोळयांच्या पारंपरिक वेशभूषेत गौरी शंकराची मिरवणूक काढून समुद्रात विसर्जन करण्यात येते.

**गौरी आवाहन**

गौरी आवाहनाच्या म्हणजे पहिल्या दिवशी संध्याकाळी गौरी आणताना गावातील अथवा वा डीतील सर्व स्त्रिया गोळा होतात. गावातील एखादा नदी, झरा, तलाव अशा नैसर्गिक पाणवठ्याच्या ठिकाणी जमतात. तेरड्याची झाडे हलक्या हाताने म्हणजे मुळे तुटणार नाहीत या बेताने उपटून त्यांची जुडी बनविली जाते. ही मुळे म्हणजेच गौरींची पावले, असा समज आहे.ते सर्व एका स्त्रीच्या हातात देतात. तिथे त्यास नागवेलीचे पान लाऊन त्यावर काजळाने डोळे, कान आणि नाक काढतात. त्यास हळदी कुंकू, रानफुले वाहून पुजा करतात. तिथून वाजत गाजत पायघड्या घालत घ री आणतात. घराच्या उंबऱ्यातून आत आणताना, जिच्या हातात गौरी असतील त्या बाईचे पाय पा ण्याने धुतात आणि त्यांवर कुंकवाचे स्वस्तिक काढतात घराच्या दरवाज्यापासून ते जिथे गौरी बसवा यच्या त्या जागेपर्यंत गौरीच्या पायांचे चुन्याचे किंवा कुंकवचे ठसे उमटवत गौरींचे मुखवटे आणतात. त्यावेळी स्वयंपाक घरातील घरगुती वस्तु म्हणजे ताट, चमच्याने किंवा घंटेच नाद करतात. काही ठिकाणी यानंतर त्यांची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील माळ्यावर नेतात, धान्याची रास, दुध-दुभत्याची जागा इ. गोष्टी दाखविण्याची प्रथा आहे. तेथे त्यांचे आशीर्वाद मिळून समृद्धी येओ अशी प्रार्थना करतात. तेरड्याची जुडीचा मुळीचा आणिदेठाचा भाग वर करून जेथे नागवेलीचा पान बांधलेला

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

असतोत्यावर मातीचा, कागदी अथवा धातूचा मुखवटा चढवितात. त्यास साडी, चोळी नेसवून पारंपरिक दागदागिन्यांनी सजवितात. पहिल्या दिवशी संध्याकाळी गौरीला दहीभात तसेच भाजी-भाकरीचा नैवैद्य दाखवण्याची पद्धत आहे.

**गौरीपूजन (दिवस दुसरा)**

दुसऱ्या दिवशी म्हणजेच ज्येष्ठा नक्षत्रावर गौरींची पूजा होते. सकाळी गौरींची पूजाआरती करून केलेल्या फराळाचा रव्याचा लाडू, ओल्या नारळाची करंजी यास कानोले म्हटले जाते. यांचा नैवेद्य दाखवतात. दुपारी ओवसा पूजतात संध्याकाळी आरती करतात. पुरणपोळी ज्वारीच्या पिठाची आंबील, अंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ वगैरे पदार्थचा नैवेद्यात समावेश असतो. नैवेद्यात डाळीची चटणी, भोपळा, पडवळ घालून केलेली दही, कटाची आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, वेगवेगळ्या प्रकारचे पापड लोणचे यांसारख्या पदार्थांचा समावेश असतो. केलेले सर्व पदार्थ केळीच्या पानावर ठेवतात. दुसऱ्या दिवशी गौरी सासरी परत जाणार म्हणून रात्री नाचा गाणी जगारण केले जाते. रात्री गौरी रडविणे हा विधी होतो. तेंव्हा सर्वांना तिचा चेहरा देखील उदास दिसतो.

गौरीसाठी म्हटली जाणारी गाणी

**गौराईची गाणी**

रांजणाच्या बुडाखाली थंडगार पाणी

मायबोले लेक माझी सरावना तानी

बालपणाच्या बुगड्या लेकी लेग बालपणी

रांजणाच्या बुडाखाली थंडगार पाणी

बालपणाच्या पैंजण लेकी लेग बालपणी

रांजणाच्या बुडाखाली थंडगार पाणी

**गाणे दुसरे**

पाटा बाय पाटा ताशीवर पाटा

आमची गवर जाते सासरी संगे नारळाच्या भेटा

पाटा बाय पाटा ताशीवर पाटा

आमची गवर जाते सासरी संगे खारकांच्या भेटा

पाटा बाय पाटा ताशीवर पाटा

आमची गवर जाते सासरी संगे बदमांच्या भेटा

या गीतातून सासरी जाणाऱ्या गौरीला प्रेमाने दिल्या जाणाऱ्या खारीक, बदाम सारख्या जिन्नसचे वर्णन आले आहे. खारीक, बदाम भेटी घेऊन जाणारी ही गवर श्रीमंता घरची आहे हे सांगायला नकोच, परंतु आपल्या घरी नसले तरी सासरी जाणाऱ्या लेकीला चांगलं चुंगल देऊन पाठवावे ही उत्कट भावना यातून दिसून येते.

**ववसा अथवा ओवसा पूजाविधी**

या दिवशी स्त्रिया ववसा अथवा ओवसा पूजतात. दाते शब्द कोशानुसार वोवसणे हा शब्द वसा म्हणजे व्रत अथवा नेम मधून आला आहे. ज्ञानेश्वरीत हा शब्द अनेक वेळा आलेला आहे. एके ठिकाणी व्रतस्थ अशा अर्थाने विशेषण म्हणून आला आहे. कां वाण धडीजे घरा | ओवसीयाचे | (ज्ञा. १७.२८६) ओवसा पूजणे हा सर्व विवाहित सुवासिनी स्त्रियांनी करावयाचा विधी आहे. यात पूर्वा नक्षत्र असेल तर नववधू माहेरहून आणलेली पाच आणि नवऱ्याकडील पाच सुपे पुजतात. ज्या स्त्रिया एक वर्ष होऊन गेल्या असतील त्यांनी दरवर्षी ओवासा विधी कारचा

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

असतो. यात प्रत्येक सुपाला हळदी कुंकवाची पाच बोटे लावून पूजतात. त्याच्या पुढील भागास दोरा बांधला जातो. सुपामध्ये काकडी, करांदा, हळद, भेंडी, भोपळा अथवा कारले यांची पाने ठेवून त्यात पाच फळे ठेवली जातात. त्याला वाण बोलतात. काही ठिकाणी सुपांमध्ये घरकांना (एक प्रकारचा कंद), माखा, आखाडा तशी तुळशीचे पान करंदीचे पान मखमलीची पाने तुळशीची पाने ऐन फळ व इतर फळे घेऊन सजवलं जातं जे शेतकऱ्याच्या शेतात पिकत असेल त्याचे पान घेतले जाते. यातील वाण किंवा वायन सर्वात प्रथम नवरा आणि मग इतरांना नेमके कुणाला वाटतात.

दिवशी म्हणजे गौरी पूजनाच्या दिवशी भल्या पहाटे चार-पाच वाजता तिचा पती शंकर महादेव तिला नेण्यासाठी माघारी येतो हा जावई म्हणजे शंकरोबा याला यजमान आणयला जातात. आणण्याचे ठिकाण हे गावातील एखादी विहीर असते जिथून गौरीला आणले जाते. या विहीरीतील गढूभर पाणी आणलं जातं हाचा शंकरोबा असल्याचे मानतात. याला गौरीच्या शेजारी बसवितात.

रात्रभर जागून गौरीला जागवले जाते. शंकर कधीकधी वाघाच्या रूपाने येऊन तिला पळवून नेतो असे मानले जाते. अशा घटना पूर्वी झाल्याचे लोक सांगतात. असे घडल्यास पुन्हा त्या घरी गौरई येत नाही. त्या दिवशी रात्री नाचून आणि खेळून झाल्यावर उत्तररात्री पहाटे चार वाजता गौराईला रडवतात म्हणजे तिला दुसऱ्या दिवशी सासरी परत जावयाचे असल्याने निरोप दिला घेतला जाण्याचं कार्यक्रम असतो. याला गौईला रडविणे असे म्हणतात.

**विसर्जन (दिवस तिसरा)**

तिसऱ्या दिवशी म्हणजेच मूळ नक्षत्रावर गौरींचे विसर्जन करतात.त्या दिवशी सकाळी पोव त्याच्या/सुताच्या गाठी पाडतात. त्या सुतात हळदीकुंकू, सुकामेवा, बेलफळ, रानफुले, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल, रेशमी धागा असे एक एक जिन्नस घालून गाठी पाडतात. यांमध्ये हळदीकुंकू, रेश मी सूत, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल हे महत्वाच्या वस्तू असतात. नंतर गौरींची पूजा आणि आर

ती करतात. गोड तंदुळाची खीर, उडीदाचे भाजलेले पापड याचा नैवेद्य दाखवतात. तिसऱ्या दिवशी पाहुणी आलेली माहेरवाशिण गौरी जाणार म्हणून घरातील वातावरण खिन्न असते. गौरींची पूजा, आ रती करून पुढील वर्षी लवकर येण्याचे अवतान देऊन त्यांचा निरोप घेतला जातो. गौरीचे आणि नि र्माल्याचे नदीच्या पाण्यात विसर्जन केले जाते.धातूच्या किंवा कायम स्वरूपाच्या मूर्ती असतील तर त्यांचे विसर्जन करत नाहीत. गौरींचे पाण्यात विसर्जन केल्यावर परत येताना नदीतील थोडी माती घ री आणून घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. यामुळे घरात समृद्धी येते व झाडाझुडुपांना कीड लागत नाही असा विश्वास असतो.

## सारांश आणि महत्व

एकंदर गौरी पूजन प्रथा आणि पूजनचे स्वरूप पहाता त्याचा कृषि म्हणजे शेतीशी असलेला संबंध लक्षात येतो. शेतीचा शोध स्त्रियांनी लावला असे इतिहास संशोधकांचे मत आहे. पाणवठ्यावरु न आणली जाणारी देवी, तिच्या पूजनात वापरली जाणारी सूप आणि इतर कृषि साधने या मताला पृष्टी देतात. देशावर म्हणजे पठारी भागात महालक्ष्मी अथवा जेष्ठा लक्ष्मीचे पूजन केले जाता असले तरी कोकणात गौरी ही महालक्ष्मी म्हणून पूजली जात नाही हे निरीक्षण नोंदविले पाहिजे. मात्र गौरी अथवा महालक्ष्मी यांच्या पुजाविधी-

विधांनाच्या मांडणीत फरक असला तरी त्याचे मूळ हेतू शेतीतून आलेले धान्य लक्ष्मीच्या पू जेचा, भूमीच्या सुफलीकरणाचा आहे असे मत लोहिया शर्मा यांनी व्यक्त केले आहे. हा सण स्त्रियांशी निगडीत आहे. गौरीच्या पूजेसाठी वापरलेल्या पूजेच्या साहित्यावरून हे अधोरेखित होते. तसेच गौरी ची स्थापना नक्षत्राला धरून होते. त्याचा वेळेस गणेशाचे आगमन मात्र तिथीनुसार होते. ज्या नक्षत्रा वर गौरी येतात ते अनुराधा नक्षत्र भारतीय परंपरे नुसार स्तन, पोटासंबंधी अथवा गर्भधारणेशी निग डीत आहे. देवीला वाहण्यात येणाऱ्या कळलावी अथवा अग्निशिखा या फुलाच्या वेलीच्या मुळांचा उप

योग स्त्रियांना प्रसव वेदना येण्यासाठी केला जातो हे सूचक आहे. या सणातून पानं फुलांचे औषधी उ पयोग लक्षात घेऊन त्यांचाच वापर पूजेत केला आहे.

अनेक ठिकाणी गौरीला नैवेद्य म्हणून विविध प्रकारचे पक्वान्न बनविले जातात. परंतु मत्स्योपजीवी समजात नैवेद्य म्हणून दाखविले जाणारे मासे, खेकडी सारखे जिन्नस जे आपण खातो तेच देवलाही देणे या साध्यामनोवृत्तीतून आले आहे. पावसाळ्यात मासेमारी होत नाही. एकदा पाव साळा संपला नारळी पौर्णिमे नंतर आगरी, कोळी लोकं समुद्राला नारळ वाहून आपल्या नावा समुद्रात घालतात, चांगले मासे भाद्रपद महिन्यात मिळायला सुरुवात होते. खेकडी, मासे, गाबोळी याच का ळात मिळायला सुरुवात होते. तेच देवीला वाहिले जातात. यातून सणांचा साधेपणा आणि त्या दैव ता विषयी असलेली माया, ममत्व दाखविणारे आहे. मासे आणि मांसाचा नैवेद्य तिला कसं द्यायचा हा प्रश्न त्यांच्या भबड्या मनास पडत नाही. आपले सण, वार, उत्सव हे आपल्या पूर्वजांनी पर्यावरण, कृषि परंपरा आणि लोक यांच्याशी सांगड घालून केल्या होत्या हे लक्षात येते.

## संदर्भ

[1].ढेरे, रा. चिं, २०००, लोकदैवतांचे विश्व, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

[2].जोशी महादेव, १९६२, भारतीय संस्कृती कोश, खंड.

[3].*डॉ.लोहिया, शैला, २०००, भूमी आणि स्त्री, गोदावरी प्रकाशन.*

[4].*ऋग्वेदी श्री, २००१, आर्यांच्या सणांचा इतिहास, वरदा प्रकाशन, पुणे.*

[5].प्राचार्य कोळी विठ्ठल, २०१२. महाराष्ट्रातील लोकगीते एक गीतमय प्रवास , साकेत प्रकाशन, पुणे.

[6].काणे पा.वा.धर्मशास्त्राच इतिहास, खंड ५.